# MT EDUCARE LTD.

**QUEST- I (Semi Prelim - II)**
**2018 - 19**

पाठ - ७ ते १२, **पद्य** - ४ ते ७ **स्थूलवाचन** - ३, ४
**व्याकरण,** उपयोजित लेखन

---

**CBSE - X** **Set - B**

**Roll No.** | | | | | | | |

**Code No. 52/1**

**Series LRH/1**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| • | खण्डः क | : | १. अपठित गद्य उतारा<br>२. अपठित गद्य उतारा | 12 गुण |
| • | खण्डः ख | : | रचनात्मक लेखन<br>१. निबंध लेखन किंवा कथालेखन<br>२. पत्र लेखन | 12 गुण |
| • | खण्डः ग | : | व्याकरण | 16 गुण |
| • | खण्डः घ | : | साहित्य : गद्य, पद्य, स्थूलवाचन | 40 गुण |

***Time allowed*** : 3 hours ***Maximum Marks*** : 80

# MARATHI

**General Instructions :**

(१) चार खंड आहेत - क, ख, ग आणि घ.

(२) सूचनेप्रमाणे सर्व प्रश्न आवश्यक आहेत.

(३) सूचनेप्रमाणे प्रश्न सोडवावेत.

## खंड 'क'

**Q.1. खालील प्रश्नांची उत्तरे गद्य उताऱ्याच्या साहाय्याने सोडवावीत.**

रोज काही तरी 'नवे' पाहिजे. मनाला आणि देहाला नव्या झिणझिण्या पाहिजेत, डोळ्यांना नवे दृश्य पाहिजे. उन्हाळ्याच्या सुट्या झाल्या, की मोटारी - स्कूटर तर जाऊ दे, मोटारीमागे जोडलेले घरच्या घर घेऊन ही माणसे शेकडो मैलांचे प्रवास करीत असतात. एके काळी निदान घर ही तरी स्थिर वस्तू होती. पण आता घरांनाही चाके फुटली आहेत. अगदी घरासारखी घरे ! बसाय्-उठायची खोली, शयनगृह, पाकगृह, सगळे काही त्यात असते. फक्त खाली आठ दहा चाके ! त्यातून भ्रमन्ती चाललेली. असल्या फिरत्या घरांसाठी जागोजागी मोकळी मैदाने आहेत. त्या मैदानातल्या जागा पैसे भरून अडवायच्या. काही सुंदर अरण्ये आहेत, तिथे तंबू घेऊन जायचे. मोकळ्यावर राहायचे. पण त्या अरण्यात सुटीच्या दिवसांत हजारो तंबू पडलेले असतात. म्हणजे पुन्हा भयंकर गर्दी ! फक्त मनाची समजूत करून घ्यायची, की आपण शहरापासून दूर-दूर आलो ! तिथेही पोर्टेबल टेलिव्हिजन आहे. रात्र-रात्र नाच-गाण्यांचा उच्छृंखल दंगा आहे पण भ्रमंतीतून शांती लाभेल, अशीही एक श्रद्धा आहे. असल्या ह्या दिशाहीन भ्रमंतीतूनच जगभर हिंडणाऱ्या अमेरिकन टूरिस्टांचा उदय झाला. आता 'टूरिझम' हा फारच प्रचंड धंदा झाला आहे. इतकेच नव्हे, तर अमेरिकन टूरिस्टांना आपापल्या देशात ओढून आणण्याची चढाओढ सुरू झाली आहे. कुठलीही प्राचीन वास्तू किंवा दृश्य सतत कॅमेऱ्याने टिपीत भ्रमण करणाऱ्या ह्या टूरिस्टांना 'भ्रमिष्ट'च म्हणायला हवे! ताजमहालपेक्षाही, जिथे किड्यासारखे मानवी जीवन वळवळत असते असल्या झोपडपट्ट्या पाहण्याचा उत्साह मोठा ! कारण समृद्ध अमेरिकेतल्या लोकांना त्यांत 'न्यू' आणि 'एक्सायटिंग' असे काहीतरी पाहायला मिळते. त्यांची 'एक्साइटमेंट' कशाने होईल, सांगता येत नाही.

प्रश्न:

| | | |
|---|---|---|
| १. | पण भ्रमंतीतून शांती लाभेल, अशीही एक श्रद्धा आहे. (काळ ओळखा) | **1** |
| २. | काही सुंदर अरण्ये आहेत, तिथे तंबू घेऊन जायचे. (वाक्यातील विशेषण ओळखा) | **1** |
| ३. | फिरत्या घरांचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ? | **2** |
| ४. | अमेरिकन टूरिस्टांबद्दल लेखकाने कोणती माहिती सांगितली आहे ? | **2** |

**Q.2. खालील प्रश्नांची उत्तरे गद्य उताऱ्याच्या साहाय्याने सोडवावीत.**

मासा पाण्यात पोहतांना शेपटीने पाणी ढकलून पुढे जातो, आपणही पोहताना हातपाय हलवून पाणी ढकलतो व पुढे जातो. पक्षी पंख हलवून हवेला ढकलतात तेव्हाच त्यांना उडता येते माणसाने पक्ष्यांप्रमाणे हवेत उडायचे ठरविले तर त्यालाही हवा ढकलण्यासाठी पंख लागतील. असे पंख तयार करून व ते हातांनी हलवून उडायचे असे जर त्याने ठरविले तर काय होईल ? पक्ष्यांच्या मानाने त्याला फार मोठे पंख वापरावे लागतील. कारण पक्ष्यांच्या शरीरातील हाडे बारीक आणि पोकळ असल्यामुळे फार हलकी असतात. शिवाय पक्ष्यांच्या शरीरात हवेच्या पिशव्या असल्यामुळे शरीराच्या आकाराच्या मानाने त्यांचे वजन फारच कमी असते. माणसाचे शरीर मात्र पक्ष्यांच्या मानाने खूपच बोजड असते. त्याला फार मोठे पंख लावावे लागतील.

पक्षी जेवढ्या जोराने आपले पंख हलवतील तेवढ्या जोराने माणसाला आपले प्रचंड पंख हलविता येणार नाहीत. पक्षी जरी आकाराने लहान आणि वजनाने हलके असले तरी त्यांचे स्नायू हलविण्याची शक्तीच माणसांच्या स्नायूमध्ये नसते. त्यामुळे माणसाला जरी पंख दिले तरी त्याला पक्ष्यांप्रमाणे उडता येणार नाही. माणसाचेच काय पण कोंबडा, मोर, शहामृग असे अनेक पक्षी आहेत की ज्यांना पंख असूनही फार उडता येत नाही. त्याचे शरीर बोजड असते व पंखही कमकुवत असतात. शहामृगाला तर मुळीच उडता येत नाही.

प्रश्नः

१. 'कमकुवत' या शब्दाचा समान अर्थाचा शब्द लिहा. **1**

२. पक्षी हवेत का उडू शकतात ? **1**

अ) पक्षी लहान असतात. ब) पक्षी चपळ असतात.

क) पक्षी पंख हलवून हवा ढकलतात. ड) पक्षी हलके असतात.

३. माणसाला पंख दिले तरी त्याला उडता का येणार नाही ? **2**

४. शहामृग का उडू शकत नाही ? **2**

खंड 'ख'

**Q.3. खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा. (कोणतेही एक)**

१. **श्रमाचे महत्त्व** **7**

(**मुद्दे** :- श्रम म्हणजे काय ? - श्रमाचे महत्त्व - श्रमाने मिळणारे आयुष्यातील यश - मानवाला श्रमाची आवश्यकता - आळस माणसाचा शत्रू - श्रमाने मात - श्रम कधीही वाया जात नाहीत - आधी मेहनत मग फळ - शेवट)

२. **परीक्षा रद्द झाल्या तर ....**

(**मुद्दे** :- एक मजेदार कल्पना - परीक्षांचे विविध प्रकार - परीक्षांमुळे विद्यार्थ्यांवर येणारी बंधने - परीक्षा नसल्यामुळे होणारे फायदे-तोटे - परीक्षांची आवश्यकता.)

३. **विदूषकाचे आत्मवृत्त**

(**मुद्दे** :- परिचय - बालपण - जबाबदारीचे ओझे - सर्कसमध्ये नोकरी - प्रशिक्षण - मिळणारा आनंद - सेवाभाव हेच ध्येय, अनुभव - समाधानी.)

**किंवा**

**मुद्दे** : माहेरी आलेली मुलगी – आईवडिलांकडून गरिबीबद्दल अपमान – माहेरी न येण्याचा निश्चय – बारा वर्षांनंतर भावाचे बहिणीकडे जाणे – तिचा सुखी संसार – भावाला पश्चाताप – तात्पर्य. **7**

**Q.4. खालील विषयावर पत्र लिहा.** **5**

१. संजय / संगिता जाधव, सरस्वती विद्यालय, जोगेश्वरी (प.), मुंबई. येथून विद्यार्थी प्रमुख या नात्याने व्यवस्थापक, आयडीयल ग्रंथ भांडार, महात्मा गांधी रोड, दादर (प.) मुंबई. यांच्याकडे आपल्या शाळेच्या ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी करतो/ करते. (लिफाफा आवश्यक)

**किंवा**

२. आनंद / अनिता सावंत, विकास हायस्कूल, कन्नमवार नगर, पुणे, येथून शाळेच्या क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी प्रसिद्ध क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर, ए-५, इंद्रवदन सोसायटी, सेना भवन, दादर यांना निमंत्रित करणारे पत्र लिहित आहे. (लिफाफा आवश्यक)

**खंड 'ग'**

**Q.5. अ) खालील प्रश्नांची उत्तरे कंसातील सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही चार)** **4**

१. कोकणात पावसाळयात भरपूर पाऊस पडतो. (अधोरेखित शब्दची जात ओळखा)

२. सुरेश आणि रमेश दोघे मित्र आहेत. (उभयान्वयी अव्यय ओळखा)

३. छे ! मला नाही आवडत ते. (केवलप्रयोगी अव्यय ओळखा)

४. सीमा अभ्यास करते. (क्रियापद ओळखा)

५. साने गुरुजी दयाळू शिक्षक आहेत. (विशेषण ओळखा)

६. ती भीतीने थरथर कापत होती. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

**Q.5. आ) पुढील वाक्ये कंसातील सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही दोन)** **2**

१. रामा तलवार हाती घेतो. (प्रयोग ओळखा)

२. राजूने फुलपाखरास पकडले. (प्रयोग ओळखा)

३. शांततेला आवाज असतो. (उद्गारार्थी करा)

४. आम्ही कधी आपण होऊन परस्थांच्या घरी अनाहूतपणे जात नाही. (प्रश्नार्थी करा)

**Q.5. इ) सूचनेनुसार बदल करा. (कोणतेही दोन)** **2**

१. अशोक वडापाव खात असतो. (काळ ओळखा)

२. हितेशने कविता वाचली. (वर्तमानकाळ करा)

३. तो मला मदत करेल. (काळ ओळखा)

४. सैनिक शत्रूला मारतो. (भूतकाळ करा)

**Q.5. ई) लिंग बदला. (कोणतेही दोन)** **2**

१. नाग - ...........  २. पती - ...........

३. तरूण - ...........  ४. देव - ...........

**Q.5.** उ) **वचन बदला. (कोणतेही दोन)** **2**

१. आंबे - ........... २. भाकरी - ...........
३. शहर - ........... ४. नद्या - ...........

**Q.5.** ऊ) **समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** **2**

१. पोट - ........... २. घर - ...........
३. सण - ........... ४. सूर्य - ...........

**Q.5.** ए) **विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** **2**

१. नवीन × ........... २. कठीण × ...........
३. विरोध × ........... ४. कमी × ...........

**खंड 'घ'**

**Q.6.** अ) **योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही चार)** **4**

१. चार-पाचशे वर्षांत .......... बरीच विस्तारत गेली आहे.
(कुटुंबवेल, वंशवेल, खानदानवेल, लोकवस्ती)
२. वरोऱ्याच्या ..... उपाध्यक्ष म्हणून ते बिनविरोध निवडून आले.
(ग्रामपंचायतीचे, नगरपालिकेचे, महानगरपालिकेचे, ग्रामसभेचे)
३. मानसी वाचता वाचता तशीच ............. जाते. (झोपी, स्वप्नात, घरात, वाचत)
४. मुंग्या सगळ्या .......... होऊन ऐकत होत्या या नागिणीचे शहाणपण.
(शांत, तल्लीन, स्तब्ध, मुग्ध)
५. एकदा मी घार झालो ............ फिरून आलो. (ढगात, नभात, आभाळात, आकाशात)
६. आता या आनंदवनात .......... पावलं उमटू लागली.
(प्रगतीची, विकासाची, सुधारणेची, ज्ञानाची)

**Q.6.** आ) **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही सहा)** **6**

१. पुस्तकराव काय ठणकतोय, अशी तक्रार करतात?
२. कुणाचं आयुष्य केवळ क्षणभंगुर आहे?
३. शेताच्या कर्त्याकडून अम्मा काय आणायची?
४. मुंग्यांची मुलं कोणावर रागावली?
५. 'आनंदवन' महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यात आहे?
६. केशवचा स्वभाव कसा आहे?
७. बाबांनी जगाच्या नकाशात कोणाचे स्थान उच्च स्थानावर नेऊन ठेवले आहे?
८. संदल कसे असायला हवे, अन्यथा स्वीकारले जात नाही ?

**Q.7.** अ) आकृतिबंध पूर्ण करा (कोणतेही तीन) **6**

१.




२.




३.




४.




५.




**Q.7.** आ) खालील प्रश्नांची ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा : (कोणतेही दोन) **6**

१. आनंदवनाच्या निर्मिती आधी बाबांनी वरोऱ्याला श्रमाश्रमाचा कोणता प्रयोग केला?
२. निसर्गाची आपणाकडून कोणती अपेक्षा आहे?
३. बाबूजींनी आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी कोणते कष्ट घेतले?
४. 'तोच असतो मोठा ज्याचा मित्र पुस्तकराव' असे का म्हटले आहे?

**Q.8.** अ) **योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. (कोणतेही चार)** **4**

१. चंद्र, सूर्य अन् इथली माती यांना अमुचे लाख ..........
(नमस्कार, मुजरे, प्रणाम, वंदन)

२. आपण जिजाऊच्या .......... (पाती, साथी, जाती, नाती)

३. .......... बनाशेजारी आंब्याची आमराई.
(बांबूच्या, बाभळीच्या, करवंदीच्या, गुलाबाच्या)

४. खुरटी ........ आकाशाला भिडावीत.(झाडे, झुडपे, वृक्ष, तरु)

५. विषमतेची ........... उडून जावेत अस्मानात, (दगडधोंडे, दगडगोटे, दगडमाती, दगड)

६. देऊ ........... आपण ही भारी. (आरोळी, किंकोळी, ललकारी, ओरड)

**Q.8.** आ) **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **3**

१. तुफान कशाचं सुटावं, असे कवीला वाटते?

२. कवीला गावापासून दूर कोणी केले आहे?

३. कवीच्या मते दुःख गिळून स्त्री काय करते?

४. उंच नभात काय फडफडत आहे ?

५. कवयित्रीस जीवन कसे वाटते?

**Q.9.** अ) **खालील पद्यपंक्तींचा सरळ अर्थ लिहाः (कोणतेही एक)** **3**

१. इंद्रधनूचे रंग वेगळे, तरिही त्यांची एक कमान
विभिन्नतेतहि देश गातसे एकत्वाचे गीत महान ।।

२. वळण वाकड्या नदीत आहे खळखळते पाणी
नजर पाखरू भिरभिरे पण अबोल होई वाणी

३. सोसून सोसून किती गं सोसावं,
गिळून दुःख सारं, साऱ्या जगा पोसावं

**Q.9.** आ) **आकृतिबंध पूर्ण करा (कोणतेही तीन)** **4**

१.



२.




३.




**Q.10. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **4**

१. पंढरपूर आणि रत्नागिरी या गावांतील कोणती वैशिष्ट्ये लेखकाने वर्णन केली आहेत?

२. आपण खोटारडेच आहोत, असे चिनारला का वाटले?

३. कोल्हापुरी गुळाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे?

***Best of Luck***